सं. फौ. ख. क्र. ९७/२०१६
सरकार विरुध्द रावसाहेब नरवाडे
निशाणी क्र. २० खाली

**<u>आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जगदंबे यांच्यामार्फत सरकारी सा.क्र.८ व्यंकटरतन बुवा भारती यांचा शपथेवरील उलटतपास सुरु.</u>**

**०३** हे खरे आहे की, आरोपी रावसाहेब नरवाडे याने या प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार यांच्याविरुद्ध गैरकायदयाची मंडळी जमवुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची फिर्याद दिली होती. हे खरे आहे की,आरोपीने ती तक्रार प्रस्तुत प्रकरणातील तक्रारीच्या पुर्वी दिली होती. हे खरे आहे की, मधुकर, सुधाकर व लोभाजी ही फिर्यादी सुंदराबाई हिचे मुले आहेत. हे मला माहिती नाही की, व्यंकट मारोती नरवाडे हा फिर्यादीचा पुतण्या आहे अथवा तिच्या भावकीतील आहे. मी पंचनामा लेखी नोटीस दिल्या नव्हत्या. मी साक्षीदारांना त्यांचे जबाब नोंदवण्यासाठी लेखी नोटीस दिल्या नाही. घटनास्थळापासुन पोलीस स्टेशन हे २० कि.मी. अंतरावर आहे. फिर्यादीला दवाखाण्यात उपचारासाठी पाठविल्याबाबत एम.एल.सी.रिपोर्ट हस्तगत केला नाही. हे खरे नाही की, आरोपींनी फिर्यादी व साक्षीदाराला मारहाण केली नाही अथवा जिवे मारण्याची धमकी दिली नाही. मी घटनास्थळाचे फोटो काढले नाही. हे खरे आहे की, आरोपी व फिर्यादी दरम्यान झालेल्या दोन्ही प्रकरणांचा तपास माझ्याकडे देण्यात आलेला आहे.

**०४.** घटनास्थळावर एकुण किती लोक हजर होते, हे तपासात निदर्शनास आले आहे. हे खरे नाही की, आरोपीने तक्रार दिल्यामुळे फिर्यादीने देखील तक्रारी अर्ज दिला. हे खरे नाही की, फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी खोटा तपास केला आणि आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, तपासादरम्यान मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे काहीही निष्पन्न झाले नाही तरी देखील त्यांच्या सांगण्याप्रमाणे खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास–पुर्ण**
**फेरतपास–काही नाही.**

माझ्यासमक्ष व श्रवणोत्तर स्वीकृती,
Sd/–
**(एस.ए.हरणे)**

**दिनांक: ०८.१०.२०२४**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, धर्माबाद.**